


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २९६ वा | शनिवार | दि. २५ जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये




# मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील दोषी तहव्वूर राणाला, अमेरिका लवकरच भारताला सोपवणार...

**वृत्तसंस्था/ मुंबई**

मुंबईवरील २६ नोव्हेंबर २००८ रोजी करण्यात आलेल्या दहशतवादी हल्ल्याचा दोषी तहव्वूर राणा याला लवकरच भारतात आणले जाणार आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने भारत-अमेरिका प्रत्यार्पण करारानुसार राणाच्या प्रत्यार्पणाला मंजुरी दिली आहे. तहव्वूर राणाला एफबीआयने २००९ मध्ये अटक केली होती. नोव्हेंबर १३, २०२४ रोजी राणाने कनिष्ठ न्यायालयाच्या प्रत्यार्पणाच्या निर्णयाविरुद्ध अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयात अपील केले, जे २१ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले. प्रत्यार्पण टाळण्यासाठी राणाची ही शेवटची संधी होती. यापूर्वी त्याने सॅन फ्रान्सिस्को येथील न्यायालयात अपील केले होते, जिथे त्याची याचिका फेटाळण्यात आली होती. दोन्ही देशांमधील प्रत्यार्पण करारानुसार त्याला भारतात पाठवले जाऊ शकते, असे अमेरिकन न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले होते. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या ४०५ पानांच्या आरोपपत्रात आरोपी म्हणून राणाच्या नावाचाही उल्लेख आहे. त्यानुसार राणा हा आयएसआय आणि लष्कर-ए-तोयबाचा सदस्य आहे. या आरोपपत्रानुसार राणा हल्ल्याचा मुख्य आरोपी, डेव्हिड कोलमन हेडली याला मदत करत होता. २६ नोव्हेंबर २००८ रोजी समुद्रामार्गे भारतात शिरलेल्या लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवाद्यांनी मुंबईवर हल्ला केला. या हल्ल्यात १६६ लोकांनी आपला प्राण गमावला. तरस, ३०० जण जखमी झाले. मृतांमध्ये काही अमेरिकन नागरिकांचाही समावेश आहे. दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत पोलिसांनी ९ दहशतवाद्यांना ठार केले. आणि अजमल कसाबला अटक केली. त्याला २०१२ मध्ये फाशी देण्यात आली होती. राणा-हेडलीने मुंबई हल्ल्याची ब्ल्यू प्रिंट तयार केली होती. मुंबई पोलिसांच्या आरोपपत्रानुसार, राणा भारतात आल्यानंतर हल्ल्याचे ठिकाण आणि राहण्याची ठिकाणे सांगून दहशतवाद्यांना मदत करत होता. राणानेच ब्ल्यू प्रिंट तयार केली होती, ज्याच्या आधारे हा हल्ला करण्यात आला होता. मुंबई हल्ल्याचा कट रचण्यात राणाची मोठी भूमिका होती, असे आरोपपत्रात म्हटले आहे. प्रत्यार्पणाच्या निर्णयाविरुद्ध राणाने केलेले अपील अमेरिकन कोर्टाने १५ ऑगस्ट रोजी फेटाळले होते. दोन्ही देशांमधील प्रत्यार्पण करारानुसार त्याला भारतात पाठवले जाऊ शकते, असे अमेरिकन न्यायालयाने १५ ऑगस्ट रोजी दिलेल्या निर्णयात म्हटले होते. परंतु, भारताच्या ताब्यात जाऊ नये म्हणून पाकिस्तानी वंशाच्या तहव्वूर राणाने अमेरिकेच्या न्यायालयात हेबियस कॉर्पस म्हणजेच बंदी प्रत्यक्षीकरण दाखल केला होता.(कैदयाला न्यायालयात प्रत्यक्ष हजर करण्याची आज्ञा) लॉस एंजेलिसच्या जिल्हा न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले होते की, भारताने तहव्वूरच्या प्रत्यार्पणाची मागणी ज्या आरोपांच्या आधारे केली आहे, त्या आरोपांचा विचार करून त्याच्या प्रत्यार्पणाला परवानगी दिली जाऊ शकते. आपल्या विरोधात निकाल दिल्यानंतर राणाने नवव्या सर्किट कोर्टात दुसरी याचिका दाखल केली होती. याबाबतचा निर्णय गुरुवारी आला. ज्यामध्ये हेबियस कॉर्पस याचिका फेटाळण्यात आली होती. मुंबईवरील हल्ल्यासंदर्भात राणावर लावण्यात




आलेल्या आरोपांचे भक्कम पुरावे भारताने दिले आहेत. गेल्या वर्षी न्यायालयीन सुनावणीदरम्यान सरकारी वकिलांनी असा युक्तिवाद केला होता की, तहव्वूर हा हल्ल्याचा मास्टरमाइंड डेव्हिड हेडलीचा बालपणीचा मित्र आणि लष्कर-ए-तैयबासोबत काम करत आहे. हेडलीला आर्थिक मदत देऊन तहव्वूर दहशतवादी संघटना आणि दहशतवाद्यांना पाठिंबा देत होता. हेडली कोणाला भेटत होता, काय बोलत होता याची माहिती राणाकडे होती. त्याला हल्ल्याचे नियोजन आणि काही ठिकाणांची नावेही माहीत होती. राणा हा या संपूर्ण कटाचा एक भाग होता. आणि त्याने दहशतवादी हल्ल्यासाठी निधी पुरवल्याचा गुन्हा केल्याचा पूर्ण संशय आहे, असे अमेरिकन सरकारने म्हटले आहे.

## सहाकर विभाग बुलढाणा जिल्हा व बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहाकरी बँक यांच्या सयुक्त विद्यामाने रक्त शिबीराचे आयोजन...

**जनसंचलन/बुलढाणा**

शांत व सालस स्वभावाची मुक्ताई पुणे येथील एका ट्राफिक सिग्नल वर दुचाकी घेऊन थांबलेली होती. परंतु यमदूत बनवून आलेल्या भरधाव डंपरने जोरदार धडक दिल्याने तीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे सहकार विभाग बुलढाणा व दि बुलढाणा केंद्रीय सहाकरी बँक म.बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यामाने दि २६ जानेवारी रोजी आंतराष्ट्रीय सहकार वर्ष व प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.सहकार विभाग बुलढाणा जिल्हा,जिल्हा लेखापरिक्षण विभाग बुलढाणा,जिल्ह्यातील नागरी सहकारी बँका,नागरी व कर्मचारी पतसंस्था,बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँक, जिल्हा देखरेख सहाकरी संस्था यांचे अधिकारी कर्मचारी,सहकारी संस्थाचे अध्यक्ष,पदाधिकारी व सहकार क्षेत्रातील सभासदांना रक्तदानाचे महत्व विचारात घेउन आवाहन करण्यात येते की दि २६ जानेवारी २०२५ रोजी आयोजित




रक्तदान शिबिरासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन रक्तदान करावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी दि बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेचे डॉ अ.वा. खरात यांनी केले आहे

## साई करणार प्रजासत्ताक दिनाला मोफत दंतचिकित्सा!

**जनसंचलन/बुलढाणा**

प्रजासत्ताक दिन मोठ्या आनंदात आणि उत्साहपूर्ण रविवारी साजरा होणार आहे.या अनुषंगाने विविध उपक्रम राबविले जातील.त्यामध्ये साई दंत रुग्णालयाकडून गरजू रुग्णांसाठी मोफत दंत चिकित्सा व औषधोपचार शिबिराच्या आयोजन करण्यात आले आहे. गेल्या २३ वर्षां पासून राष्ट्रीय सण व महापुरुषांच्या जयंती निमित्त साई नंतर रुग्णालयाकडून सामाजिक उपक्रमांतर्गत मोफत चिकित्सा शिबीर आयोजित करण्यात येते. यंदा २६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजेपासून सदर शिबिर हे जिजामाता क्रीडा संकुलाच्या दुकान क्रमांक ५ या साई दातांच्या दवाखान्याच्या



नवीन जागेत होणार आहे. सदर शिबिरात दवाखान्याचे संचालक डॉ. प्रकाश अंभोरे हे दंत रुग्णांची तपासणी करणार असून त्यांना एक्सरे पासून तर आवश्यक औषधींपर्यंत सर्व सुविधा मोफत देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील गरजू रुग्णांनी सदर शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहन मुख व दंतरोग तज्ञ डॉ. प्रकाश अंभोरे यांनी केले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा



जनसंचलन/बुलढाणा

राज्याचे मदत व पुनर्वसन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री हे शनिवार, रविवार दि. २५ व २६ जानेवारी २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार शनिवार दि. २५ जानेवारी २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी ११.४५ वाजता सिंदखेडराज येथे आगमन व जिजाऊ माँ साहेब जन्मस्थळी अभिवादन आणि जिजाऊ सृष्टीस भेट. दुपारी १२.१५ वाजता ॲड. नाझेर काझी(जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) यांच्या निवासस्थानी भेट आणि राखीव. दुपारी १२.४५ वाजता देऊळगाव राजाकडे प्रयाण. दुपारी १ वाजता देऊळगाव राजा येथे आगमन व आमदार मनोज कायंदे यांच्या निवासस्थानी राखीव. दुपारी १.४५ वाजता बुलढाणाकडे प्रयाण. दुपारी ३ वाजता शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथे आगमन व राखीव. दुपारी ३.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय विभागांची आढावा बैठक. सोईनुसार शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथे आगमन व राखीव. रविवार दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१० वाजता शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथून पोलिस कवायत मैदानाकडे प्रयाण व सकाळी ९.१५ वाजता शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थिती. सोईनुसार शासकीय विश्रामगृह, बुलढाणाकडे प्रयाण व राखीव. दुपारी १२ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, बुलढाणा पक्ष कार्यालय येथील बैठकीस उपस्थिती. दुपारी १.३० वाजता बुलढाणा येथून शेगांवकडे(संत नगरी) प्रयाण. दुपारी २.३० वाजता शेगांव येथे आगमन व श्री संत गजानन महाराज दर्शन. दुपारी ३ वाजता मुंबईकडे प्रयाण.




# महसूल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा जिल्हाधिकारी यांचे हस्ते शुभारंभ

## क्रीडा स्पर्धातून अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळेल- डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा



महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना विरंगुळा मिळावा तसेच शारिरीक तंदुरुस्तीसह त्यांच्यातील कला गुणांना आपल्या व्यस्त कामामुळे समाजासमोर आणता येत नाही. क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातुन त्यांना या कला गुणांना समोर आणण्याची संधी मिळेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. महसूल विभागाच्यावतीने दोन दिवशीय महसूल क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन जिल्हा क्रिडा संकुल येथे करण्यात आले. या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी महसूल समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी भुसंपादन राजेंद्र पोळ, सुरेश थोरात, अजिंक्य गोडगे, उपजिल्हाधिकारी निवडणूक सुहासिनी गोणेवार, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, शैलेश काळे, शरद पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर तसेच सर्व तहसिलदार, महसूल विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, महसूल प्रशासन शासनाचा कणा आहे. शासनाच्या सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या सांभाळण्याचे व नागरिकांच्या समस्या व अडीअडचणींचे निराकरण करण्याची जबाबदारी महसूल कर्मचाऱ्यांवर असते. अशा व्यस्त व ताणतणावाच्या कामातून विरंगुळा मिळावा, शारिरीक तंदुरुस्तीसह कला गुणांना वाव मिळण्यासाठी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा त्यांच्यासाठी महत्वाची ठरेल. कर्मचारी खेळाडूंनी आपल्या खेळाचे कौशल्य दाखवून जिल्ह्याचे नाव विभाग व राज्यस्तरावर नावलौकिक करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

अपर जिल्हाधिकारी श्री. शेलार म्हणाले की, क्रिडा स्पर्धेमध्ये सहभाग घेतल्यास शारिरीक तंदुरुस्ती बरोबर मानसिक तंदुरुस्ती मिळते. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्यांनी कुठल्याही प्रकारच्या खेळामध्ये सहभाग नोंदवून आपल्या सहकारांनाही स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार दिनाची शपथ घेण्यात आली. त्यानंतर महोत्सवाचे उद्घाटन दिप प्रज्वलनाने करण्यात आले. जिल्ह्यातील महसूल उपविभागनिहाय पथकाव्दारे शानदार पथसंचलन करण्यात आले. त्यानंतर स्पर्धेची सुरुवात डॉ. पाटील यांनी क्रिकेट खेळून केली. यावेळी महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकेतून जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेची रुपरेषा व महत्त्व विशद केले. संचालन तहसिलदार वृशाली केसकर व ग्रामविकास अधिकारी शिवानंद वाकदकर यांनी केले.

या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात जिल्हाधिकारी कार्यालयासह उपविभागीय कार्यालय, बुलढाणा, मलकापूर, सिंदखेडराजा, मेहकर, खामगाव, जळगाव जामोद या महसूल विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये क्रिकेट, कबड्डी, थ्रो-बॉल, खो-खो, रिंग टेनिस, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुध्दीबळ, कॅरम या खेळाचा व सांस्कृतिक कार्यक्रमाचा सहभाग असणार आहे.

# कारांजा चौक येथे बाळसाहेब ठाकरे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

## शिवसेना उपशहर प्रमुख रणजित गायकवाड यांच्या उपस्थितीत ३०५ जणांनी शिवसेना सदस्य केली नोंदणी

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा शहर शिवसेना प्रेमी यांनी आमदार संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त भारतमाता कारंजा चौक शिवसेना विभागा मधील शिवसेना अंतर्गत शिवसेना सदस्य नोंदणी यशस्वी पार पाडली आहे.शिवसेना उपशहप्रमुख यांच्या उपस्थितीत हि नोंदणी पार पडली आहे. यामध्ये असंख्य महिला,पुरूष व अठरा वर्षावरील तरूण मुला मुलांनी उत्साहाने नोंदणी केली आहे यामध्ये पुरूष नोंदणी हि १२५ तर महिला नोंदणी ७५,मुले ७५ मुली ५० आहे अशा प्रकारे एकुण ३०५ जणांनी शिवसेना नोंदणी केली आहे.हा कार्यक्रम यशस्वीसाठी उपशहर प्रमुख रणजित गायकवाड,रवि भगत, अरूण खेडेकर,किशोर साठे,विनोंद शिंदे,दिपक मिटकरी,इंगळे सर,चितले अरूण भंडारी,नरेंद्र भंडारी व अनेक शिवसेना कार्यकर्ते यांनी मेहनत घेत कार्यक्रम हा यशस्वी पार पाडला आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जेष्ठ नागरीक समन्वय समितीच्या वतीने आरोग्य शिबीर संपन्न

जनसंचलन/बुलढाणा

राज्य व केंद्र शासनामार्फत जेष्ठ नागरिकांसाठी विविध आरोग्य सुविधा व योजना सुरू केल्या आहेत. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील जेष्ठासाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहे. या सुविधा व योजनांचा लाभ जेष्ठ नागरिकांनी करून घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय, ज्येष्ठ नागरिक समन्वय समिती व ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूर यांच्यावतीने आयोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण भाऊराव चव्हाण, जेष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूरचे सचिव डॉ. राजीव मिश्रा, डॉ. सुरेश छाजेड, डॉ. वसंतराव चिंचोले, डॉ. लक्ष्मणराव खर्चे, ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे मधुसूदन कुलकर्णी, तेजराव सावळे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, मानसिक आजाराच्या माध्यमातून एकलेपणाची, नैराश्याची भावना निर्माण होते. यातून स्मृतीभंश, अल्झायमर सारखे आजार जेष्ठ नागरिकांना होऊ शकतात. यातून बाहेर पडण्यासाठी मेडिटेशन, विपश्यना, योगाभ्यास करणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या कुटुंबातील मुलाबाळांमधे फारसे अडकुन न पडता, आवडत असलेल्या क्षेत्रात गुंतवून ठेवावे. अध्यात्मिक क्षेत्र, कलागुण वाचन यासारख्या विविध गोष्टींमध्ये गुंतून ठेवावे. चालणे, फिरणे यासारख्या क्रियाशील बाबी रोज नियमितपणे करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हा सामान्य रुग्णालय ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेल्या बाह्य रुग्ण कक्षाचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी बाह्य रुग्ण विभागासोबतच आंतररुग्ण विभागही सुरू करण्यात येणार आहे. या सर्व सुविधांचा ज्येष्ठ नागरिकांनी फायदा घ्यावा, असे आवाहन जिल्हा जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी केले. शिबीरामध्ये ३०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिकांनी आपली आरोग्य तपासणी डॉ. ऋषिकेश निकम, डॉ. रवी शिंदे यांनी केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भरत जाधव यांनी केले. सूत्रसंचालन अंजली परांजपे यांनी तर आभार प्रदर्शन मधुसुधन कुळकर्णी यांनी केले.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आरोग्य विभागाचा आढावा कार्यतत्पर राहून आरोग्य यंत्रणेने काम करावे- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा




आपात्कालीन परिस्थितीमध्ये आरोग्य सुविधा तातडीणे पोहचणे गरजेचे असतात. यासाठी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेने नेहमी कार्यतत्पर राहून चांगली आरोग्य सेवा द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात आरोग्य विभागाचा आढावा घेतांना ते बोलत होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.कै. उ. झिने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी तसेच सहायक संचालक आरोग्य सेवा, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिक्षक आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, राष्ट्रीय व राज्य महामार्ग, रेल्वे लाईन तसेच अतिसंवेदनशील ठिकाणी अपघात किंवा आपातकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास अशावेळी आरोग्य सुविधा तातडीने पोहोचणे आवश्यक असतात. यासाठी आरोग्य यंत्रणा सदैव तत्पर असावे. अपघात किंवा आपात परिस्थिती निर्माण होण्याऱ्या ठिकाणी रुग्णवाहिका, रुग्णालयातील बेड, ऑक्सीजन, औषधी, रक्त उपलब्धता आदी मुलभुत आरोग्य सोयीसुविधा सज्ज ठेवावे. आरोग्य विभागाने नेहमी अपडेट राहण्यासाठी प्रशिक्षणाच्या कार्यशाळा नियमितपणे घ्याव्यात. यासाठी प्रत्येक भागात एक किंवा दोन तज्ज्ञ डॉक्टरांच्या नेतृत्वात समितीचे गठण करावे. दैनंदिन कामाच्या व्यतिरिक्त त्या-त्या विषयातील तज्ज्ञ डॉक्टर इतरांना मार्गदर्शन करतील, याचे नियोजन करावे. आरोग्य संस्थेमध्ये बाळंतपण झालेल्या महिलांना १०२ क्रमांकाच्या गाडीतून घरपोच पोहचविण्याचे प्रमाण वाढवा. हे उद्दिष्ट १०० टक्केच असले पाहिजे. जिल्ह्यात मातामृत्यु-बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी यांनी उपाययोजना राबवावी. तसेच आशावर्कर व अंगणवाडी सेविकामार्फत नवजात बालकांच्या आरोग्याची नियमित माहिती घेऊन लसीकरण होत असल्याची खात्री करावी. तालुका व ग्रामस्तरावर कुष्ठरोग जनजागृती करण्यासाठी दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२५ या पंधरवाड्यात विविध आरोग्य शिक्षणाचे कार्यक्रम राबवावे, असेही निर्देश डॉ. पाटील यांनी दिले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील लसीकरण मोहीम, महिलांची हिमोग्लोबीन तपासणी, मातामृत्यु प्रमाण, बालमृत्यु प्रमाण, जन्मदर-मृत्युदर, जननी सुरक्षा योजना, कुटुंब नियोजन कार्यक्रमाची अंमलबजावणी, जननी शिशु सुरक्षा योजना, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, सिकलसेल नियंत्रण, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, मोबाईल मेडीकल युनीट, १०८ रुग्णवाहिका आदी विषयांचा आढावा घेतला.

# त्या बालकाच्या पालकांनी संपर्क करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

अभिषेक पडवळ या एक वर्षाच्या बालकाला त्यांच्या नातेवाईकांनी बाल कल्याण समितीकडे दि. ९ नोव्हेंबर रोजी सुपूर्त केले. तेव्हापासून बालकाला यशोधाम लव्ह ट्रस्ट फॉर इंडियन चिल्ड्रेन बुलढाणा येथे ठेवण्यात आले असून बालकाच्या पालक व रक्तसंबधातील नातेवाईकांनी अद्यापर्यंत संपर्क साधला नाही. सदर बालकाच्या पुनर्वसनासाठी दत्तक विधान मुक्त करणे आवश्यक असल्याने बालकाच्या रक्तसंबंधातील नातेवाईकांनी ३० दिवसाच्या आत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे यांनी केले आहे. बालक नामे साई ऊर्फ अभिषेक पडवळ या बालकाला त्यांची काकू नामे वंदना हरसिंग पडवळ रा. नागझरी ता.खामगाव यांनी बाल कल्याण समितीकडे स्वाधीन केले होते. या बालकाला बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार यशोधाम, दि लव्ह ट्रस्ट फॉर इंडियन चिल्ड्रेन इन नीड बुलढाणा येथे दाखल करण्यात आले. दाखल केल्यापासून या बालकाची विचारपूस, सांभाळण्यासाठी किंवा ताबा घेण्यासाठी कोणीही आलेले नाहीत. सदर बालकाचे पुनर्वसनासाठी दत्तक विधान मुक्त करणेकरिता विधी मुक्त करणे आवश्यक असल्याने बालकाचे कोणी रक्तसंबंधातील नातेवाईक असल्यास त्यांनी ३० दिवसाच्या आत यशोधाम दि लव्ह ट्रस्ट फॉर इंडियन चिल्ड्रेन इन नीड, खामगाव रोड, सेंट जोसेफ स्कुल जवळ,



सुंदरखेड ता.जि.बुलढाणा या संस्था येथे किंवा सामाजिक कार्यकर्ता रामेश्वर जाधव यांच्या मोबाईल क्र. ९५५२२०६५०३ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी विक्री २८ जानेवारीपर्यात निविदा आमंत्रित

जनसंचलन/बुलढाणा



जिल्हा माहिती कार्यालयातील वृत्तपत्रांची रद्दीची विक्री करावयाची आहे. त्यासाठी रद्दी खरेदीदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. सध्या आहे त्या स्थितीतील रद्दी असलेल्या प्रचलित दराप्रमाणे जास्त दर देणाऱ्या निविदाधारकास रद्दी विक्री केली जाणार आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी वृत्तपत्र रद्दी खरेदीसाठी दरपत्रके बंद पाकीटात दि.२८ जानेवारी २०२५ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालय, तळमजला, प्रशासकीय इमारत, बुलढाणा येथे सादर कराव्यात. या तारखेनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही, असे जिल्हा माहिती कार्यालयाने कळविले आहे. रद्दी विक्री दरपत्रक मंजूर करण्याचे अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयाला राहील.

# तो अल्पवयीन मुलीला छत्तीसगड येथे पळवून नेत होता पण...

जनसंचलन/ शेगाव



अल्पवयीन मुलींना पळवून नेण्याच्या घटना वारंवार घडताहेत.. अनेक सैराट प्रकरणे ताजे असतांना, शेगाव आरपीएफ पोलिसांनी एक युवक अल्पवयीन मुलीला सुरत वरून छत्तीसगड येथे रेल्वेने पळवून नेत असतांना दोघांनाही ताब्यात घेऊन गुजरात पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. घटना अशी की, २२ जानेवारीला १३ वर्षीय अल्पवयीन मुलगी एका युवकासोबत अजमेरपुरी एक्सप्रेसने पळून जात आहे व ट्रेन मलकापूर वरून निघून गेल्याची सूचना सुरत पोलीस ठाण्यातून निरीक्षक मलकापूर एस एस हरणे यांना दिली. यावरून स उ नि प्रवीण भरणे, प्रधान आरक्षक रंजन तेलंग, आरक्षक समाधान गवई यांच्या टीम ने ट्रेन येण्यापूर्वी सापळा रचून ट्रेन येताच शोध घेऊन दोघांना ताब्यात घेतले. अधिक शहानिशा केली असता सदर युवक अल्पवयीन मुलीला छत्तीसगड येथे घेऊन जात असल्याचे समजले. याची माहिती गुजरात पोलिसांना कळविण्यात आली असता, गुजरात पोलिसांची एक टीम सुरत पोलीस चे एएसआय योगेश भाई रतन पाटील,महिला कांस्टेबल-पीनल बेन आणि आरक्षक एम आर चौधरी हे सुरत वरून रवाना होऊन शेगाव येथे पोहचले.दरम्यान कायदेशीर कारवाई करून अल्पवयीन मुलीला व युवकाला ताब्यात घेऊन गुजरातला रवाना झाले.

# पोक्सो व बाल विवाह कायद्याची अंमलबजावणी करा- अॅड संजय सेंगर

जनसंचलन/बुलढाणा


महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य अॅड. संजय सेंगर हे बुलडाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी बालकांच्या क्षेत्रातील विविध सामाजिक स्वयंसेवी संस्था आणि यंत्रणेला भेट देऊन आढावा घेतला. यावेळी पोक्सो आणि बाल विवाह कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे सूचना अॅड. सेंगर यांनी दिले. जिल्हाधिकारी यांच्या दालनात बालकांच्या कायद्यांवर काम कारणाऱ्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, बाल न्याय मंडळाचे प्रमुख दंडाधिकारी शितल बजाज, उज्वला कस्तुरे, गोरक्षनाथ भालेराव, पोलीस उपअधीक्षक महामुनी, बाल कल्याण समिती अध्यक्ष सदस्य डॉ मनोज डांगे, अॅड. वर्षा वावगे, जयश्री शिंदे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे, बाल कामगार विभागाचे अधीक्षक हुडेकर तसेच जिल्हा परिषद उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग आणि बाल कल्याण विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. आढावा बैठकीमध्ये अॅड. सेंगर यांनी पोक्सो आणि बाल विवाह कायद्याच्या कठोर अंमलबजावणीबाबत चर्चा केली. बाल विवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून ग्रामसेवक यांच्यामार्फत बालविवाह संबंधी तक्रारी दाखल करुन कडक कार्यवाही करण्यात यावी. जिल्ह्यातील बालकांच्या क्षेत्रात कार्यरत सामाजिक स्वयंसेवी संस्था यांच्याशी समन्वय साधून बालकांच्या कायद्या व अधिकाराबाबत जनजागृती करावी, अशा सूचना दिल्या. त्यानंतर महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त असलेले बालकांच्या क्षेत्रातील विविध सामाजिक स्वयंसेवी संस्था आणि यंत्रणा यांना भेट देण्यात आली. त्यामध्ये महिला बाल विकास विभाग, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा चाइल्ड हेल्पलाइन, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, बालकामगार शिक्षण, आरोग्य विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, शासकीय मुलांचे बालगृह, निरीक्षण गृह, शिशु बालगृहाचा समावेश होता. यावेळी त्यांनी बालकांच्या काळजी व संरक्षणात असलेल्या बालकांची योग्य ती काळजी घ्यावी. तसेच त्या बालकांना योग्य कुटुंब मिळेल याची खात्री करावी. काळजी आणि संरक्षणाची बालके यांच्या संदर्भात विविध प्रकरणा संदर्भातील आढावा घेऊन अवलोकन करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सर्व विभाग प्रमुखांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, १०९८ चा प्रसार व प्रचार करावा. जेणेकरून बालकांना आणि सामान्य जनतेला याबाबत तक्रार करणे साईचे होईल. जिल्ह्यात असलेल्या बालकांच्या दिव्यांग शाळा आणि खाजगी व्यवस्थापन यांना भेटी देणे तसेच बालकांच्या हितासंबंधित सामाजिक संस्था यांना फिट पर्सन म्हणून घोषित करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

# रिटायर्ड एसीपी डॉ. रियाज़ देशमुख यांची समाजवादी पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी नियुक्ती

वृत्तसंस्था/संभाजीनगर



समाजवादी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आणि आमदार अबू असीम आझमी यांनी एक मोठा निर्णय घेत महाराष्ट्र पोलीस विभागातील डॅशिंग अधिकारी, रिटायर्ड असिस्टंट पोलीस कमिशनर डॉ. रियाज़ देशमुख यांची महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या पोलीस विभागातील दीर्घ अनुभवामुळे समाजवादी पक्षाला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे. रिटायर्ड झाल्यानंतर डॉ. रियाज़ देशमुख संभाजीनगर येथे वास्तव्यास आहेत. त्यांनी नेहमीच अन्यायग्रस्त आणि पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. मागील चार वर्षांपासून ते औरंगाबाद येथून सत्यपत्रक या मराठी दैनिकाचे संपादन व प्रकाशन करत आहेत, ज्याद्वारे सामाजिक मुद्द्यांवर आवाज उठवला जातो. सन २०२३ मध्ये रामनवमीच्या वेळी किराडपूरा येथे झालेल्या दंगलीत पोलिसांच्या अंधाधुंद फायरिंगमध्ये एका निष्पाप व्यक्तीचा मृत्यू झाला होता. शेख मुनिरुद्दीन नामक व्यक्ती आपल्या घराच्या कुलुपबंद गेटच्या आत असताना त्याला गोळी लागून मृत्यू झाला होता. परंतु, पोलिसांनी त्याच्यावर खोटी एफआयआर दाखल करून त्याला जमावातील असल्याचे दाखवले. या प्रकरणात डॉ. रियाज़ देशमुख यांनी पुढाकार घेत पोलिसांना त्यांच्या चुकीसाठी नागडे केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे सरकारला या गोळीबाराच्या प्रकरणाची दंडाधिकारी चौकशीचे आदेश द्यावे लागले. चौकशीदरम्यान डॉ. देशमुख यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांना दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करून बिल्डिंग मधील सीसीटीव्ही फुटेज सादर करून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. आमच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नावर डॉ. रियाज़ देशमुख म्हणाले की, संभाजीनगर नव्हे, तर महाराष्ट्रात कुठेही अत्याचार झाला तर मी अन्यायग्रस्तांसाठी आवाज उठवेन. त्यांनी असेही स्पष्ट केले की, समाजवादी पक्षाला महाराष्ट्रात अधिक बळकट करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहतील. डॉ. रियाज़ देशमुख यांच्या पोलीस विभागातील अनुभव आणि सामाजिक कार्याचा मोठा फायदा पक्षाला होईल, असे समाजवादी पक्षाचे नेतृत्व मानत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाला नवा जोम मिळेल, अशी आशा आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958